# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

## म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या यादीतील नोंदीमधील गिरणी संकेत क्रमांकात गिरणी कामगार / वारस अर्जदारास विहित नमुन्यातील अर्जान्वये दुरुस्ती करणेबाबत

## जाहिर निवेदन

गिरणी कामगारांच्या बृहन्मुंबई महानगर पालीका क्षेत्रातील भारत मिल, वेस्टर्न इंडिया मिल, सेंच्युरी मिल, प्रकाश कॉटन मिल, रुबी मिल व स्वान मिल ज्युबिली अशा एकुण ०६ गिरण्यांच्या जमिनीवरील गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांची संगणकीय सोडत **दि.०९.०५.२०१६** रोजी सकाळी १०.०० वाजता **स्थळ - रंगशारदा सभागृह, के.सी.मार्ग, वांद्रे रिक्लेमेशन, वांद्रे (प), मुंबई ४०००५०** येथे काढण्यात येणार असल्याबाबतची जाहिरात दि.२२/०४/२०१६ रोजीच्या वर्तमानपत्रात तसेच म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर बाबतीत याद्वारे जाहीर करण्यात येते की, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बंद / आजारी गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांसाठी बांधण्यात येणा-या सदनिकांकरीता उपरोल्लेखित ६ गिरण्यांच्या ज्या कामगारांनी अथवा त्यांच्या वारसांनी सन २०१०-२०११ मध्ये विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर केले होते, मात्र केवळ गिरणी संकेत क्रमांक चुकीचा नोंद केल्यामुळे त्यांची नावे उपरोक्त ०६ गिरण्यापैकी संबधित गिरणीच्या गिरणी कामगार / वारस अर्जदारांच्या यादीमध्ये आढळुन येत नाहीत, अश्या गिरणी कामगार / वारस अर्जदारांना सदर यादीमधील अर्जातील गिरणी संकेत क्रमांक मध्ये बदल करावयाचा असल्यास खाली नमुद केल्यानुसार विहित नमुन्यामध्ये, विहित मुदतीत व विहित ठिकाणी दुरुस्ती अर्ज सादर करावा.

१) **अर्ज सादर करण्याची मुदत व स्थळ :-**
   - दि.२७.०४.२०१६ ते ०३.०५.२०१६ पर्यंत (कार्यालयीन दिवशी सकाळी ११.०० ते साय ५.०० वाजेपर्यंत)
   - उपमुख्य अधिकारी (पुर्व)/ मुं.मं.,कक्ष क्र.२०२/२०४, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व),मुंबई - ४०००५१.

२) **विहित नमुन्यातील अर्ज मिळण्याचे ठिकाण :-**
   - म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in
   - "म्हाडा लॉटरी केंद्र"मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५, जवळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.),मुंबई - ५१.

३) **विहित नमुन्यातील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**
   - बँकेत अर्ज भरल्याची पोचपावती, ओळखपत्र,आवश्यक असणारे गिरणीबाबतची कागदपत्रे, इत्यादी (सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकींत करावी).

४) **सुधारीत यादी प्रसिध्द करण्याची तारीख व स्थळ :-**
   - **दिनांक ०५.०५.२०१६**
   - म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.maharashtra.gov.in

टिप :-

- यापूर्वी दुरुस्तीसाठी केलेल्या अर्जाचा किंवा उपरोक्त विहित मुदतीनंतर प्राप्त होणा-या दुरुस्ती अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी.
- म्हाडाच्या संकेतस्थळावर नोंद असलेल्या अर्जदारांनाच गिरणी संकेत क्रमांक दुरुस्ती अर्ज सादर करता येईल. म्हाडाच्या संकेतस्थळावर असलेल्या यादीबाहेरील अर्जदारांना दुरुस्ती अर्ज किंवा नवीन अर्ज सादर करता येणार नाही, असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**अधिक माहितीसाठी संपर्क**

"म्हाडा लॉटरी केंद्र "
मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५, जवळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.),मुंबई - ५१.
हेल्प लाईन नं. ९८६९९८८०००
०२२-२६५९८९२१ ते २४, ०२२-२६५९२६९२/९३
म्हाडा संकेतस्थळ: https://mhada.maharashtra.gov.in/?q=millworkers_lottery

(सुभाष लाखे)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

**म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या गिरणी संकेत क्रमांक व अर्ज क्रमांक यामध्ये दुरुस्ती करावयाचा नमुना अर्ज**

दिनांक :-

प्रति,
उपमुख्य अधिकारी / (पुर्व)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
वांद्रे (पूर्व),मुंबई - ४०००५१

विषय :- गिरणी संकेत क्रमांकात व अर्ज क्रमांकात दुरुस्ती करणेबाबत विनंती अर्ज.
संदर्भ :- म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील गिरणी संकेत क्र.---- व अर्ज क्र.----
महोदय,

मी स्वत: / माझे वडील / माझी आई/पती /पत्नी /आजी / आजोबा नामे --------------------------------- यांनी गिरणी कामगारांच्या घरासाठी सारस्वत बॅंक/ ॲक्सिस बॅंक येथे अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) **म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती**

| | |
|---|---|
| गिरणी संकेत क्रमांक व गिरणीचे नाव | |
| अर्ज क्रमाक | |
| म्हाडाच्या संकेतस्थळावरील अर्जदाराचे नाव | |

म्हाडाच्या संकेतस्थळावरील उपरोक्त माहितीमध्ये तसेच कार्यालयीन अभिलेखामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात यावा, अशी आपणांस विनंती करण्यात येते.

२) **दुरुस्त करावयाची माहिती**

❖ **अ) गिरणी संकेत क्रमांकात बदल करावयाचा असल्यास**

| | |
|---|---|
| सुधारीत संकेत क्रमांक. | |
| सुधारीत गिरणीचे नाव | |

❖ **ब) अर्ज क्रमांकात बदल करावयाचा असल्यास**

| | |
|---|---|
| सुधारीत अर्ज क्रमांक | |

❖ **नको असलेले खोडावे**

वरील प्रमाणे माहितीत बदल करण्यास माझी कोणतीही हरकत नाही. भविष्यात वरील बदल झालेल्या माहितीमध्ये म्हाडा कार्यालय जबाबदार राहणार नसून मी व्यक्तीश: वरील केलेल्या बदल / दुरुस्तीस जबाबदार राहील व या बदलास माझी अथवा माझ्या वारसांची कोणतीही तक्रार नसुन त्याबाबत मी न्यायालयात दाद मागणार नाही. वरील विनंतीनुसार बदल / दुरुस्त करावयाबाबतचा मा.मुख्य अधिकारी/मुं.मं.यांचा निर्णय मला मान्य राहील.

आपला विश्वासु,

| | |
|---|---|
| गिरणी कामगार / वारस अर्जदाराचे नाव | |
| स्वाक्षरी | |
| ओळखपत्र व त्यांचा क्रमांक | |

**टिप :-** सदर अर्जासोबत अर्जदाराने आपल्या विनंतीच्या अनुषंगाने बॅंकेत अर्ज भरल्याची पोचपावती, ओळखपत्र, गिरणी संकेत क्रमांक बदल / दुरुस्ती करावयास आवश्यक असणारी गिरणीबाबतची स्वसाक्षांकींत कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत.